देशात बांगलादेशी नाहीत, फक्त मोदी सरकार; असदुद्दीन ओवैसी यांचा गंभीर आरोप >>पान 2

कोल्हापूरच्या रणरागिणीचा अनोखा संकल्प; ३५०० पेक्षा जास्त किलोमीटरची युनेस्को किल्ले धाव मोहिम >>पान 3

जिजाऊंच्या मार्गदर्शनाने शिवबांनी स्वराज्य निर्माण केले : प्रकाश जाधव >>पान 4

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 158 ■ बुधवार, दि. 14 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

**सुविचार**

मुंगीपाशी जा तिचा उद्योग शिका व शहाणे व्हा. – ओल्ड टेस्टामेंट




'द राजा साब' चित्रपटाच्या कमाईमध्ये झाली घट, जाणून घ्या बॉक्स ऑफिस कलेक्शन... आतील पान

# लाडक्या बहिणींनो बँक खातं चेक करा, संक्रांतीआधीच पैसे जमा झाले; आचारसंहितेच्या कात्रीतून सुटका

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील लाडक्या बहिणींना यंदाच्या महिन्यात संक्रांत सणाच्या पार्श्वभूमीवर १५०० रुपये बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. निवडणूक आयोगाने आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर नियमित योजनेचा लाभ देण्यास परवानगी दिल्यानंतर आजपासून राज्यातील कोट्यवधी लाडक्या बहिणींना या योजनेचे पैसे मिळण्यास सुरुवात झाली असून सकाळपासूनच मोबाईलवर मेसेज आले आहेत. महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात आदर्श आचारसंहिता लागू असताना 'लाडकी बहीण' योजनेचा नियमित किंवा प्रलंबित लाभ देता येईल; परंतु जानेवारी महिन्याचा लाभ अग्रिम स्वरुपात देण्यास राज्य निवडणूक आयोगाने मज्जाव केला आहे. त्यानंतर, डिसेंबर महिन्याचा १५०० रुपयांचा हफ्ता बँक खात्यात जमा झाला आहे.

''लाडक्या बहिणींना मकर संक्रांतीची मोठी भेट देण्यासाठी १४ जानेवारी पूर्वी लाडक्या बहिणींच्या खात्यात डिसेंबर व जानेवारी महिन्याचे तीन हजार जमा होणार,'' अशा आशयाच्या प्रसिद्ध झालेल्या बातम्यांच्या आधारे राज्य निवडणूक आयोगाकडे विविध तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यासंदर्भातील वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी लाडकी बहिण योजनेसंदर्भात शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे, असे राज्य निवडणूक आयोगाने मुख्य सचिवांना कळिवले होते.

''राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आदर्श आचार संहितेबाबत एकत्रित आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशातील तरतुदींनुसार निवडणूक जाहीर होण्यापूर्वी प्रत्यक्ष सुरू झालेली विकासकामे व योजना आचारसंहिता काळात सुरू ठेवण्यास परवानगी आहे,'' असे मुख्य सचिवांनी आपल्या अहवालात कळिवले होते. ही पार्श्वभूमी लक्षात घेता, या योजनेचा नियमित लाभ देता येईल; परंतु अग्रिम स्वरुपात लाभ देता येणार नाही; तसेच नवीन लाभार्थींदेखील निवडता यणार नाहीत, असे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले. त्यामुळे, लाडक्या बहिणींना ३००० ऐवजी १५०० रुपये देण्यास परवानगी मिळताच, मतदानाच्या दोन दिवस अगोदर लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात आजपासून १५०० रुपये जमा होण्यास सुरुवात झाली आहे.

राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान आहे. तर, महायुतीतील दोन घटकपक्षांच्या उमेदवारांकडून त्यांच्या सोशल मिडीया अकाऊंटवरून येत्या १४ जानेवारीपूर्वी लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात तीन हजार रुपये जमा होणार असल्याचा दावा केला जात होता. सरकारकडून मकरसंक्रातींच्या दिवशी निधी वितरित करण्यात आला तर निवडणुकीच्या आचारसंहितेचा हा भंग नाही का असा सवाल विरोधकांकडून उपस्थित करण्यात आला. त्यामुळे, आदर्श आचारसंहितेच्या कात्रित अडकलेल्या लाडक्या बहिणींची सुटका झाली आहे.



## श्री तुळजाभवानी देवींची सिंहासन पूजा; फेब्रुवारी २०२६ ची ऑनलाईन नोंदणी २० फेब्रुवारीपासून

**दैनिक आपला विदर्भ**

**धाराशिव/प्रतिनिधी :** महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीच्या सिंहासन पूजेची फेब्रुवारी – २०२६ मधील नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे.भाविकांनी अधिकृत संकेतस्थळावरून आपली नोंदणी करावी. असे आवाहन मंदिर संस्थानने केले आहे.

महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश,कर्नाटक,तेलंगणा आणि इतर राज्यांमधून मोठ्या संख्येने भाविक कुलाचार व कुलधर्मासाठी तुळजापूरला येतात. श्री तुळजाभवानी देवीची सिंहासन पूजा ही अत्यंत श्रद्धेने केली जाणारी पूजा असून, नोंदणीसाठी http://shrituljabhavani.org या अधिकृत संकेतस्थळावर 'सिंहासन पूजा पास बुकिंग' या मेन्यूवर क्लिक करून, https://shrituljabhavanimataseva.org या लिंकवर जाऊन नोंदणी करावी.

नोंदणीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे. नोंदणी कालावधी : २० जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता ते २५ जानेवारी रोजी सकाळी १० वाजेपर्यंत.प्रथम सोडतीचे ऑनलाईन पेमेंट : २७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. भाविकांनी प्रथम फेरीचे ऑनलाईन पेमेंट २७ जानेवारी सकाळी ११ ते २८ जानेवारी रोजी सकाळी १० वाजेपर्यंत करावे. सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास ऑनलाईन ड्रॉ पध्दतीने व्दितीय सोडत व भाविकांना पेमेंटसाठी २८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता एसएमएस पाठविण्यात येईल. व्दितीय फेरीचे ऑनलाईन पेमेंट २८ जानेवारी सकाळी ११ ते २९ जानेवारी सकाळी १० वाजेपर्यंत करता येईल. प्रथम व द्वितीय फेरीत सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास ऑनलाईन ड्रॉ पद्धतीने तृतीय सोडत व भाविकांना पेमेंटसाठी एसएमएस २९ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजतापर्यंत पाठविण्यात येईल.तृतीय फेरीचे ऑनलाईन पेमेंट २९ जानेवारी रोजी सकाळी ११ ते ३० जानेवारी रोजी सकाळी १० वाजेपर्यंत करता येईल.फेब्रुवारी २०२६ या महिन्यातील अंतीम सिंहासन पूजा बुकींग झाल्याची यादी ३० जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता प्रसिद्ध करण्यात येईल. वरीलप्रमाणे सिंहासन पूजा नोंदणीचा लाभ घ्यावा.असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या व्यवस्थापक (प्रशासन) यांनी केले आहे

# राज्यातील १२ जिल्हा परिषद, १२५ पंचायत समित्यांसाठी निवडणुका जाहीर

## पाच फेब्रुवारीला मतदान, सात तारखेला निकाल

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील प्रलंबित असलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगानं पत्रकार परिषद घेत याबाबतची घोषणा केली. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मंगळवारी (१३ जानेवारी २०२६) दुपारी याबाबतची माहिती दिली. महानगरपालिका निवडणूक अवघ्या दोनच दिवसांवर असतानाच जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. राज्यातील १२ जिल्हा परिषद, १२५ पंचायत समित्यांसाठी ५ फेब्रुवारीला मतदान होणार असून, सात फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.**




- **उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठीची तारीख – १६ जानेवारी ते २१ जानेवारी २०२६**
- **उमेदवारी अर्ज छाननी व चिन्ह वाटप – २२ जानेवारी २०२६**
- **उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख – २७ जानेवारी २०२६**
- **मतदानाची तारीख – ५ फेब्रुवारी २०२६**
- **निकालाची तारीख – ७ फेब्रुवारी २०२६**

न्यायालयाच्या निर्णयानंतर निवडणुका जाहीर – राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडं डोळे लावून बसलेल्या कार्यकर्त्यांसाठी तयारीला लागण्याची संधी निर्माण झाली. सर्वोच्च न्यायालयानं सोमवारीच राज्य निवडणूक आयोगाला १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. यापूर्वी न्यायालयानं ३१ जानेवारी २०२६ पर्यंत या निवडणुका घेण्याची अंतिम मुदत दिली होती. मात्र, तांत्रिक आणि प्रशासकीय कारणास्तव निवडणूक आयोगानं १० फेब्रुवारीपर्यंत वेळ मागितला होता. अखेर मंगळवारी राज्य निवडणूक आयोगानं निवडणुका जाहीर केल्या आहेत.

कोणत्या १२ जिल्हा परिषदेच्या निवडणुका होणार? – लातूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीची घोषणा झाली.

२५ हजार ४८२ मतदान केंद्र तयार – या निवडणुकीत प्रत्येक मतदाराला दोन मतं देणे गरजेचे आहे. एक मत हे जिल्हा परिषद आणि एक मत हे पंचायत समितीसाठी देणं गरजेचं आहे. निवडणुकीसाठी २५ हजार ४८२ मतदान केंद्र तयार आहेत. या केंद्रावर सर्व सोयी उपलब्ध असणार आहेत. या निवडणुकीसाठी १ जुले २०२५ पूर्वीची मतदान यादी वापरली जाणार आहे.

## खासगी शाळांमध्ये गरीब विद्यार्थ्यांना मोफत प्रवेशाची खात्री करा : सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली : समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना परिसरातील खासगी शाळांमध्ये प्रवेश नाकारला जाणार नाही, याची खात्री करणे ही राज्य सरकारे आणि स्थानिक प्रशासनांची जबाबदारी आहे, असा महत्त्वपूर्ण निकाल आज (दि. १३) सर्वोच्च न्यायालयाने दिला. खासगी विनाअनुदानित शाळांनी २५ टक्के कोट्यातून गरीब विद्यार्थ्यांना प्रवेश देणे हे केवळ कायदेशीर कर्तव्य नसून ते एक 'राष्ट्रीय मिशन' मानले पाहिजे, असेही बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (आरटीई) कायदा, २००९ च्या कलम १२(१)(सी) चा अर्थ स्पष्ट करताना न्यायालयाने नमूद केले.

'लाईव्ह लॉ'च्या रिपोर्टनुसार, २०१६ मध्ये पालकाने आपल्या मुलास २५ टक्के कोट्यातून प्रवेश मिळावा म्हणून मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती. मात्र, 'ऑनलाइन प्रक्रियेत अर्ज केला नव्हता' असे सांगत न्यायालयाने पालकांनाच जबाबदार धरत याचिका फेटाळली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिका पालकांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. यावर न्यायमूर्ती पी.एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती ए.एस. चांदूरकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

खंडपीठाने 'शिक्षण हक्क कायदा २००९' मधील कलम १२(१)(क) चा अर्थ स्पष्ट करताना सांगितले की, खासगी शाळांनी पहिल्या इयत्तेत किंवा पूर्व-प्राथमिक वर्गांमध्ये किमान २५ टक्के जागा वंचित गटातील मुलांसाठी आरक्षित ठेवणे अनिवार्य आहे. या बदल्यात सरकारकडून संबंधित



शाळांना प्रति विद्यार्थी खर्चाची प्रतिपूर्ती केली जाईल.

खंडपीठाने नमूद केले की, सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (आरटीई) कायदा कलम १२ अंतर्गत २५ टक्के प्रवेश देण्याच्या तरतुदीमध्ये समाजाची रचना बदलण्याची विलक्षण क्षमता आहे. याची प्रामाणिक अंमलबजावणी झाल्यास ती खरोखरच परिवर्तनीय ठरेल. हे केवळ तरुण भारताला शिक्षित करण्याच्या दिशेने उचललेले पाऊल नसून, संविधानातील समतेचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने एक ठोस उपाय आहे.

न्यायमूर्ती नरसिंहा पुढे म्हणाले की, अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश सुनिश्र्चित करणे हे एक राष्ट्रीय मिशन असले पाहिजे. ज्या पालकांना प्रवेश नाकारला जातो, त्यांना सुलभ आणि प्रभावी न्याय मिळवून देण्यासाठी न्यायालयांनी (घटनात्मक किंवा दिवाणी) अधिक तत्परतेने काम करणे आवश्यक आहे.

सर्वोच्च न्यायालयाने या खटल्यात राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाला (छउझउठ) पक्षकार करून घेतले असून, त्यांना प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयाने अनेक मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून पुढील कार्यवाहीसाठी हे प्रकरण प्रलंबित ठेवले आहे.

# बनावट देशी – विदेशी दारुचा कारखाना पकडला, २४ लाखाचा माल जप्त, गोंडवाना पिंपरीत धाड

## राज्य उत्पादन शुल्क विभागीय भरारी पथकाची कारवाई

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्य उत्पादन शुल्क विभागीय भरारी पथकाने गोंडवाना पिंपरी, हिंगणा परिसरातील माय टाऊन सोसायटी, सेक्टर-८ येथील बंगलो क्रमांक १३३ येथे छापा टाकून बनावट देशी-विदेशी दारुच्या कारखान्याला टाळे ठोकले.

घटनास्थळावरुन १ हजार ९० लिटर देशी दारुचा बनावट ब्लेंड, महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंधीत असलेल्या गोवा व्हीस्कीच्या ३५६ बाटल्या, ९० बिएल बनावट देशी दारु, इलेक्ट्रानिक बॉटल सिलींग मशिन बनावट रॉकेट देशी दारु नावाचे कागदी लेबल, जीवंत पत्रीबुचे, रिकाम्या बाटल्या, बनावट रॉयल स्टग विदेशी दारुचे जीवंत प्लॉस्टीक जीवंत बुचे, चारचाकी वाहन असा एकूण



२४ लाख ६७ हजार ७०४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यत आला. नागपूर विभागाचे विभागीय उपायुक्त गणेश पाटील व जिल्हा अधीक्षक सुरज कुमार रामोड यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

यातील मुख्य आरोपी शुभम गोविंद तिवारी वय ३१ वर्षे फरार असून गोविंद रामदत्त तिवारी वय ५९, शैलेंद्र धुर्वे वय २४, रघुनाथ उईके वय २१, राजकुमार उईके वय २५, द्वारका शिवलाल इनवाती वय ४५ व प्रमोद नथ्थुजी सयाम वय ४२ या आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. विभागीय भरारी पथकाचे निरीक्षक दशरथ क्षीरसागर, दुय्यम निरीक्षक जगदीश पवार, लांबाडे, निरीक्षक बालाजी चाळणेवार, दुय्यम निरीक्षक वैभव दीवाण, अमित क्षीरसागर, शुभम ढोके यांच्यासह सर्वश्री राहुल सपकाळ, गजानन राठोड, सुधीर मानकर, किरण वैद्य, सचिन आडोळे, विनोद डुंबरे यांनी सहकार्य केले.

## उत्तराधिकार प्रमाणपत्र आवश्यक नाही : सुप्रीम कोर्ट

नवी दिल्ली : जनरल प्रॉव्हिडंट फंडची शिल्लक ५,००० पेक्षा जास्त असली तरीही वैध नामनिर्देशित व्यक्तीला उत्तराधिकार प्रमाणपत्र, प्रोबेट किंवा प्रशासन पत्र सादर न करता रक्कम मिळण्याचा अधिकार आहे. अशा कागदपत्रांचा आग्रह धरल्याने नामांकनाची संकल्पनाच रद्द होईल, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिला आहे. 'या न्यायालयाचे असे मत आहे की, वैध नामांकनाच्या बाबतीत, मृत ठेवीदार किंवा ग्राहकाच्या भविष्य निर्वाह निधी खात्यातील रक्कम नामनिर्देशित व्यक्तीला देणे आवश्यक आहे,' असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यायमूर्ती मनोज मिश्रा आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारने दाखल केलेली याचिका फेटाळून लावली. या याचिकेत कलकत्ता उच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाला आव्हान देण्यात आले होते. यामध्ये भविष्य निर्वाह निधी कायदा, १९२५ मध्ये नमूद केल्यानुसार, ५,००० रुपयांच्या मर्यादेपेक्षा रक्कम जास्त असूनही, वारसा प्रमाणपत्राची मागणी न करता नामनिर्देशित व्यक्तीला जनरल प्रॉव्हिडंट फंडची रक्कम देण्याचा निर्णय कायम ठेवण्यात आला होता.



## वृक्षारोपणाची नितांत गरज..

भारतात गेल्या पाव शतकापासून विविध विकास प्रकल्पांखातर मोठ्या प्रमाणात नैसर्गिक जंगले नष्ट करण्यात आलेली आहेत आणि त्यामुळे मानव व वन्यजीव यांच्यातला ताणतणाव टोकाला गेलेला पाहायला मिळत आहे. २०१५ ते २०२० पर्यंत जागतिक पातळीवर ब्राझिल पाठोपाठ जंगलांचा ऱ्हास करण्याचे प्रमाण आपल्या देशात वाढलेले आहे. आसाम, मिझोराम, अऊणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर या राज्यांमध्ये गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर जंगलांचा ऱ्हास झालेला आहे. आपल्या देशाच्या अस्तित्वाला स्वदेशी वृक्षारोपणासारखे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राबवण्याची गरज निर्माण झालेली आहे. यात योगदान देण्यासाठी विविध संस्थांसोबत नागरिकांचाही वाटा वाढायला हवा. आज जागतिक पातळीवर वाढत जाणाऱ्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या आपल्या देशाच्या अस्तित्वाला स्वदेशी वृक्षारोपणाची आणि इथे असलेल्या नैसर्गिक जंगलक्षेत्राचे संवर्धन तसेच संरक्षण करण्याची नितांत गरज आहे. धरणे, पाटबंधारे, महामार्ग, लोहमार्ग, विमानतळ आणि पायाभूत साधनसुविधा निर्मितीचे आणि तत्सम विकासाचे प्रकल्प शेती व बागायती क्षेत्राचा होणारा विस्तार यामुळे आज मोठ्या प्रमाणात जंगलतोड केली जात आहे. जंगलांच्या मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या विद्ध्वंसामुळे, आज देशभर भूस्खलन, महापूर आणि वादळावेळी होणाऱ्या नुकसानीच्या प्रमाणात विलक्षण वाढ होत आहे. शेकडो वर्षांच्या कालावधीनंतर उभी राहणारी नैसर्गिक जंगले आज खाण व्यवसाय आणि विकासाच्या प्रकल्पांखातर नष्ट केली जात आहेत. वनीकरणाच्या निर्मितीसाठी प्रकल्प हाती घेणारे वन खात्याकडे निधी सुपूर्द करतात. परंतु या निधीचा योग्यप्रकारे विनियोग करून, नष्ट करण्यात आलेल्या नैसर्गिक जंगलाच्या तोडीचे वनक्षेत्र अभावानेच निर्माण करण्यात आल्याची आपल्याकडे अपवादात्मक उदाहरणे पाहायला मिळतात. त्यामुळे अपरिमित जंगलतोडीमुळे वन्यजीवांचे पारंपरिक नैसर्गिक अधिवास नष्ट होत आहेत. त्यामुळे हत्ती, पट्टेरी वाघ, गवे आणि अन्य वन्यजीवांच्या विस्थापनात लक्षणीय वाढ झालेली पाहायला मिळत आहे. भारतात गेल्या पाव शतकापासून विविध विकास प्रकल्पांखातर मोठ्या प्रमाणात नैसर्गिक जंगले नष्ट करण्यात आलेली आहेत आणि त्यामुळे मानव व वन्यजीव यांच्यातला ताणतणाव टोकाला गेलेला पाहायला मिळत आहे. २०१५ ते २०२० पर्यंत जागतिक पातळीवर ब्राझिल पाठोपाठ जंगलांचा ऱ्हास करण्याचे प्रमाण आपल्या देशात वाढलेले आहे. आसाम, मिझोराम, अऊणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर या राज्यांमध्ये गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर जंगलांचा ऱ्हास झालेला आहे. देशातले १८,२०० हेक्टर जंगल क्षेत्र २०२४ साली तर २०२३ साली १७,७०० हेक्टर जंगलक्षेत्र नष्ट करण्यात आले असल्याचे स्पष्ट झालेले आहे. खरेतर, जगातले दोन तृतियांश जंगलक्षेत्र रशिया, ब्राझिल, कॅनडा, संयुक्त अमेरिका, चीन, ऑस्ट्रेलिया, काँगो, इंडोनेशिया, भारत आणि पेरु अशा दहा देशांत असून, हे जंगल सुरक्षित राहण्यावरच मानवी समाज आणि सजीव मात्रांचे अस्तित्व अवलंबून आहे. आज जगभर दरवर्षी १३.७ दशलक्ष हेक्टर वनक्षेत्र नष्ट केले जात आहे. म्हणजे दरवर्षी ग्रीस देशाच्या आकाराएवढे वनक्षेत्र नष्ट होत आहे, ही गंभीर चिंतेची बाब आहे. आज महापूर, वादळ-वारे आदी नैसर्गिक प्रकोपात वनक्षेत्राच्या अभावी होणाऱ्या मनुष्य आणि मालमत्ता नुकसानीचे प्रमाण वाढले आहे. गेल्या काही वर्षांपासून औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि अन्य विविध कारणांपायी जंगलांच्या होणाऱ्या ऱ्हासामुळे नदी-नाल्यांची पात्रे पावसाळ्यानंतर अल्प काळातच वाहत्या पाण्याअभावी कोरडी ठणठणीत पडण्याचे प्रमाण वाढत आहे. रासायनिक खते, जंतुनाशके यांच्या वापरामुळे आणि ऊसासारख्या नगदी पिकांसाठी जलसिंचनाच्या वाढत्या मागणीमुळे वाळवंटीकरणाची प्रक्रिया विस्तारत चालली आहे. आज चीन राष्ट्र आपल्या मोठ्या लोकसंख्येची भूक भागविण्यासाठी एका बाजूला नानाविध विकासाचे महाकाय प्रकल्प हाती घेत आहे तर दुसऱ्या बाजूला नियोजनबद्ध वृक्षारोपणाचा कार्यक्रम यशस्वी करून वाढत्या वाळवंटीकरणाला आणि वाळवंटातल्या धुळीच्या वादळांना थोपवण्याबरोबर पर्जन्य दुर्भिक्ष्य असलेल्या प्रदेशात पर्जन्यवृष्टी वाढविण्याबरोबर नदी-नाल्यांच्या पावसाचे पाणी धारण करण्याच्या क्षमतेत वृद्धी करण्यात यशस्वी ठरल्याचा दावा आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांच्या गटाने केलेला आहे. १९४९ साली केवळ दहा टक्क्यांवर असलेले आपले वनक्षेत्र २०२४ पर्यंत चीनने २५ टक्के करण्यात यश प्राप्त केलेले आहे. १९७८ साली चीनने महाकाय हरित भिंत निर्माण करण्याच्या आपल्या योजनेंतर्गत नियोजनबद्ध जे वृक्षारोपण केले, त्याद्वारे जमिनीची होणारी धूप नियंत्रित करून, मातीची सूपिकता वृद्धिंगत करण्यातही यशस्वी झाले आहे. गावोगावी वनौषधी उद्याने, जैवविविधता स्थळे, स्वदेशी वृक्ष-वनस्पती उपवने निर्माण करण्याचा कार्यक्रम राष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवर प्रामाणिकपणे लोकसहभागाद्वारे राबविणे शक्य आहे. देशभरातल्या आपल्या जीवनदायिनी नद्या अराजक आणि आततायी कृत्यांमुळे गटारगंगा झालेल्या आहेत. नदी-नाले आणि पाणथळीच्या जागांना जास्तीतजास्त सिमेंट-काँक्रिटीकरणाच्या जहरी विळख्यात बंदिस्त करण्याचे षड्यंत्र नागरी सुविधा पुरविण्याच्या नावाखाली आपण आरंभलेले आहे. आपली ही आततायी वृत्ती भूमी आणि मृदेतल्या संजीवन तत्त्वाला मारक ठरणार आहे. हुकुमशाही राजवट असणाऱ्या प्रचंड लोकसंख्येच्या चीनने जे शिस्तबद्ध वृक्षारोपणाने साध्य केलेले आहे, ते लोकशाही आणि संस्कृतीप्रधान आपला देश निश्चितपणे अधिकाधिक भूमी हरित आच्छादनाने व्यापण्याचे ध्येय साध्य करू शकतो. जी पठारे पावसाळी मोसमात तृणपात्यांनी समृद्ध असतात, तेथील जैविक संपदेला कवडीमोल ठरवून निर्जिव करण्याचे षड्यंत्र रोखणे गरजेचे आहे. आगामी काळात जम्मू-काश्मीर ते अंदमान-निकोबारपर्यंत अस्तित्वात असलेली नैसर्गिक जंगले, पर्वत शिखरे, पठारे, पाणथळीच्या जागा यांचे संरक्षण आणि संवर्धन शाश्वत विकासाच्या माध्यमातून प्राप्त करणे शक्य आहे.

# देशात बांगलादेशी नाहीत, फक्त मोदी सरकार; असदुद्दीन ओवैसी यांचा गंभीर आरोप

**दैनिक आपला विदर्भ**



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** भाजपा भारतात हिंदुत्व लागू करण्याची तयारी करीत आहे, देशात कोणतेही बांगलादेशी नाहीत, फक्त मुस्लिम असल्याने त्याला बांगलादेशी सांगितले जात आहे, असा आरोप एमआयएम पक्षाचे नेते असदुद्दीन ओवैसी यांनी केलाय. महापालिका निवडणुकीच्या प्रचार सभेत महायुतीमधील घटक पक्षांवर ओवैसी यांनी कडाडून टीका केलीय. मोदींनी निवडणूक आयोगाला सांगितले की, लोकांना विचारा, तुम्ही इथले नागरिक आहात का? हिंदू मंदिरांमध्ये फक्त हिंदूच मंदिर सदस्य बनू शकतात, मुस्लिम धार्मिकस्थळांमध्ये आतापर्यंत मुस्लिम सदस्य होते, पण आता यांनी नवीन कायदा आणला, ज्यात गैर मुस्लिम देखील सदस्य होऊ शकतात. या कायद्यामुळे मशीद आणि दर्गा पाडण्याचा डाव केला जाऊ शकतो, असा आरोप असदुद्दीन ओवैसी यांनी केलाय.

जास्तीत जास्त मतदान करा : महाराष्ट्रात अजून विशेष गहन पुनरीक्षण म्हणजेच `जम्रतब ग्हूहेग्नब ीन्ग्दह लागू झाला नाही. गोव्यात एका माजी आमदाराला नोटीस देण्यात आली असून, त्यासंदर्भात निवडणूक आयोग म्हणतोय की, तुम्ही भारताचा नागरिक आहात का हे सिद्ध करा. त्यामुळेच या निवडणुकीत आधीपेक्षा जास्त मतदान एमआयएमला करायचे आहे. दलाल आणि चोरांविरोधात पतंगाचे बटन दाबले जाणार आहे. आमची मशीद, दर्गा घेणाऱ्याला मतदान होऊ शकत नाही. यावेळी मतदान केले तर कायदा आणल्यावर त्यांना सांगता येईल की, आम्ही मतदान केलंय, अशी टीका करून भाजपा विरोधात मतदान करण्याचे आवाहन असदुद्दीन ओवैसी यांनी केलंय.

पैसे देणाऱ्याचे व्हिडीओ काढा : एमआयएम पक्षाचे उमेदवार जिथे चार आहेत, तिथे चारही मतं पक्षाला करायची आहेत. नाहीतर एक याला आणि दुसरा दुसऱ्याला असं करू नका. यामुळे पक्षाचे नुकसान होईल. उमेदवार न पाहता फक्त पतंगचे बटन दाबा. आजची रात्र आणि उद्याची रात्र कुणी काही करत असेल तर त्याचा व्हिडीओ करावे आणि त्यांचाकडून जे मिळेल ते मुद्देमाल तुमचा असेल. पोलीस काय करेल मला माहीत नाही. तुम्हाला हुशार राहावे लागेल, असे काही झाल्यास पोलिसांना लगेच कळवा. जलील यांच्या गाडीवर हल्ला करणारे मतदार यांना मतदान कार्ड आमच्याजवळ ठेवा, असे सांगत आहेत हे चुकीचे आहे, तुम्हाला सांगत आहात, अशी आग लावण्याची नवीन सुरुवात करू नका, अशी टीकादेखील असदुद्दीन ओवैसी यांनी केलीय.

शहराशी नाते संपणार नाही : लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यावर देखील लोक एमआयएमशी नाते तोडायला तयार नाहीत. आमदाराच्या निवडणुकीत हरवले, पण पुन्हा आमचा आमदार निवडून येणार आहे. परिस्थितीशी आम्हाला तडजोड करायची नाही. बिहारमध्ये आम्हाला सांगितले गेले आम्ही जिंकणार नाही. लोक म्हणाले याचे चार आमदार गेले, पण आम्ही कष्ट केले, लोक आम्हाला सांगत होते, काही होणार नाही. औरंगाबादमधील दलालाचा गेम संपणार आहे, गेम आमचा सुरू होता आणि सुरू राहणार आहे. औरंगाबादमधील आमचा बालेकिल्ला हलवण्याचा प्रयत्न आहे, पण आमचा बालेकिल्ला कायम राहील, त्याला कम जोर करू शकत नाही, असा विश्वास असदुद्दीन ओवैसी यांनी मतदारांना दिला. उमेदवारी मिळाली नाही म्हणून काही लोक आले, त्यांच्या डोळ्यात अश्रू होते. पण मी त्यांना सांगितले की, तुम्हाला पक्षाची जबाबदारी दिली जाईल, असा शब्द त्यांनी पक्षातील नाराज नेत्यांना दिलाय.

## ताजमहालचे तळघर उघडणार! ३ दिवस मोफत पाहण्याची संधी

आग्रा : जगातील सातवे आश्चर्य मानल्या जाणाऱ्या ताजमहालमध्ये लवकरच मुघल सम्राट शहाजहान यांचा ३७१ वा उर्स साजरा केला जाणार आहे. यानिमित्ताने १५ ते १७ जानेवारी २०२६ दरम्यान पर्यटकांसाठी ताजमहालचे दरवाजे विनामूल्य उघडले जातील. विशेष म्हणजे, वर्षभरातून केवळ या ३ दिवसांसाठीच ताजमहालच्या तळघरात असलेल्या शहाजहान आणि मुमताज महल यांच्या मूळ कबरी पर्यटकांना पाहता येणार आहेत. भारतीय पुरातत्त्व विभागाने (एएसआय) जारी केलेल्या आदेशानुसार, उर्सच्या कालावधीत पर्यटकांना आणि भाविकांना विशेष सवलती दिल्या जाणार आहेत. मूळ कबरी पाहण्याची एकमेव संधी ताजमहालच्या मुख्य घुमटात पर्यटकांना ज्या दोन कबरी दिसतात, त्या केवळ प्रतिकृती आहेत. खऱ्या कबरी या मुख्य वास्तूच्या खाली असलेल्या तळघरात आहेत. सुरक्षा आणि संवर्धनाच्या कारणास्तव हे तळघर वर्षभर बंद असते, परंतु उर्सच्या या ३ दिवसांत ते सर्वसामान्य लोकांसाठी उघडले जाते. भाविक आणि पर्यटकांना या मूळ कबरींचे दर्शन घेता यावे, ही या महोत्सवाची मोठी जमेची बाजू आहे. १० डिसेंबर २०१८ पासून, मुख्य घुमटात गर्दीचे नियोजन करण्यासाठी पुरत्त्व विभागाने २०० रुपयांचे अतिरिक्त शुल्क लागू केले होते. मात्र, उर्सच्या या तीन दिवसांत हे अतिरिक्त शुल्क देखील आकारले जाणार नाही. म्हणजेच कोणताही पर्यटक विनातिकीट मुख्य थडग्यापर्यंत जाऊ शकेल. मोफत प्रवेशामुळे होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेता, आग्रा पोलीस आणि केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने (ण्घ्एइ) कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे. ताजमहालच्या पूर्व आणि पश्चिम प्रवेशद्वारांवर अतिरिक्त तपासणी यंत्रणा बसवण्यात आली असून, पर्यटकांनी शिस्त पाळावी असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रवेशाचे सविस्तर वेळापत्रक

१५ जानेवारी (गुरुवार) : उर्सच्या पहिल्या दिवशी दुपारी २.०० वाजेपासून ते सूर्यास्तापर्यंत ताजमहालमध्ये मोफत प्रवेश दिला जाईल. या दिवशी 'गुस्ल' हा पारंपरिक विधी पार पडणार आहे. १६ जानेवारी (शुक्रवार) : सामान्यत : शुक्रवारी ताजमहाल साप्ताहिक सुट्टीसाठी बंद असतो आणि केवळ स्थानिक नमाज पठण करणाऱ्यांनाच प्रवेश दिला जातो. मात्र, उर्सनिमित्त दुपारी २.०० वाजल्यानंतर सर्व पर्यटकांना सूर्यास्तापर्यंत विनामूल्य प्रवेश मिळेल. या दिवशी 'संदल' विधी पार पडेल. १७ जानेवारी (शनिवार) : उर्सच्या शेवटच्या दिवशी म्हणजे १७ जानेवारीला सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत संपूर्ण दिवसभर प्रवेश विनामूल्य असेल. या दिवशी मुख्य आकर्षण असलेली १७२० मीटर लांब सतरंगी चादर अर्पण केली जाणार आहे.

# मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना : शेतकऱ्यांच्या विकासाचा नवा महामार्ग



महाराष्ट्र हे कृषीप्रधान राज्य आहे. राज्यातील बहुतांश लोकसंख्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे.पेरणीपासून ते कापणी,मळणी आणि शेतीमाल बाजारात पोहोचविण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्याला सक्षम व सोयीस्कर पायाभूत सुविधांची गरज असते. यामध्ये शेतापर्यंत जाण्यासाठी असणारे शेत / पाणंद रस्ते अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात.मात्र,आजही अनेक गावांमध्ये हे रस्ते अतिक्रमणामुळे अरुंद झालेले,निकृष्ट दर्जाचे किंवा पूर्णतः वापरण्यायोग्य नसल्याचे वास्तव आहे.

यांत्रिकीकरणामुळे शेतीतील यंत्रसामग्रीचा वापर वाढला असला तरी योग्य रस्त्यांच्या अभावामुळे त्या यंत्रांचा प्रभावी वापर करणे शेतकऱ्यांसाठी कठीण ठरत आहे.या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील शेत / पाणंद रस्त्यांचे मजबुतीकरण,अतिक्रमणमुक्ती आणि दर्जेदार बांधकामासाठी राज्य शासनाने एक महत्त्वाकांक्षी आणि स्वतंत्र योजना जाहीर केली आहे,ती म्हणजे ''मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना''.

योजनेची गरज आणि पार्श्वभूमी शेत / पाणंद रस्ते हे सहसा मुख्य रस्ते योजनांमध्ये समाविष्ट नसतात. त्यामुळे त्यांची दुरवस्था दीर्घकाळ दुर्लक्षित राहते. अनेक ठिकाणी या रस्त्यांवर अतिक्रमण झालेले असून पावसाळ्यात ते चिखलमय, तर उन्हाळ्यात धुळीचे साम्राज्य असते. परिणामी शेतकऱ्यांचा वेळ,खर्च आणि श्रम वाढतात. ही समस्या लक्षात घेऊन दिनांक ७ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील ग्रामीण भागातील शेत / पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी स्वतंत्र योजना राबविण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला.या निर्णयातूनच ''मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना'' अस्तित्वात आली.

ही योजना केवळ रस्ते बांधण्यापुरती मर्यादित नसून,ती शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करणारी आहे.पूर्णपणे यंत्रसामग्रीच्या सहाय्याने जलद गतीने कामे सोपी,सुलभ आणि प्रभावी कार्यपद्धतीची आहे.अतिक्रमणमुक्त आणि बारमाही वापरण्यायोग्य रस्ते गुणवत्तेवर विशेष भर आणि दोष निवारण कालावधीची तरतूद आणि कार्यान्वयीन यंत्रणा या योजनेअंतर्गत रस्त्यांची कामे विविध यंत्रणांमार्फत करता येणार आहेत.त्यामध्ये ग्रामपंचायत,पंचायत समिती,जिल्हा परिषद बांधकाम विभाग, प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्रामसडक योजना विभाग,वन विभाग (ज्या ठिकाणी वनजमीन आहे तेथे) तसेच नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा समावेश आहे.त्यामुळे स्थानिक गरजेनुसार योग्य यंत्रणेमार्फत कामे करणे शक्य होणार आहे.

शेत / पाणंद रस्त्यांच्या कामांना तांत्रिक मान्यता देताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीनुसार अधिकार देण्यात आले आहेत.वनजमिनीच्या बाबतीत वन विभागामार्फत मान्यता देण्यात येणार आहे.प्रत्येक रस्त्याच्या कामासाठी स्वतंत्र प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विधानसभा क्षेत्र समितीचे सदस्य सचिव असलेल्या उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले आहेत.यामुळे निर्णयप्रक्रिया वेगवान होणार आहे.

निविदा प्रक्रिया व देयके २५ कि.मी. लांबीचा क्लस्टर तयार करून निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय समितीने पात्र ठरविलेल्या कंत्राटदारांनाच निविदेत सहभागी होता येणार आहे. काम पूर्ण झाल्यानंतर तांत्रिक यंत्रणेने प्रमाणित केलेली देयके उपविभागीय अधिकारी अदा करणार आहेत. निधीची उपलब्धता बहुआयामी स्रोत- या योजनेसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उघडून शासनाकडून अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येणार आहे.याशिवाय निधी,विविध योजना व अनुदाने यांचे अभिसरण करून निधी उभारण्याची मुभा देण्यात आली आहे.१५ वा वित्त आयोग, खासदार/आमदार निधी, जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी,ग्रामपंचायतीचे स्वउत्पन्न, पेसा निधी,ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार कार्यक्रम,भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना अशा अनेक स्रोतांचा प्रभावी वापर करण्याची संधी या योजनेत उपलब्ध आहे.

अतिक्रमणमुक्ती कठोर पण आवश्यक निर्णय गाव नकाशांवर दर्शविण्यात आलेल्या शासकीय रस्त्यांवरील अतिक्रमण काढण्यासाठी स्पष्ट व कठोर कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. तहसीलदारांनी ७ दिवसांची नोटीस देऊन अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी, अन्यथा शासन स्तरावरून अतिक्रमण हटविण्यात येणार आहे.या प्रक्रियेत पोलीस बंदोबस्तासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही,ही बाब विशेष महत्त्वाची आहे.गुणवत्ता,पर्यावरण आणि शाश्वतता या योजनेत रस्त्यांच्या गुणवत्तेवर विशेष भर देण्यात आला आहे.खडी,मुरूम यांची तपासणी, अनिवार्य करण्यात आले आहे.शेत / पाणंद रस्त्यांच्या दुतर्फा मनरेगा अंतर्गत वृक्ष लागवड करणे बंधनकारक असून यामुळे पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळणार आहे.

ग्रामपंचायत,महसूल व पोलीस यंत्रणेची जबाबदारी योजना यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत,महसूल यंत्रणा आणि पोलीस विभाग यांची स्पष्ट जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. ग्रामपंचायतींनी रस्त्यांचा आराखडा तयार करणे,महसूल यंत्रणेने अतिक्रमणमुक्ती व समन्वय साधणे,पोलीस विभागाने आवश्यक तेथे तात्काळ मदत उपलब्ध करून देणे या त्रिसूत्री समन्वयामुळे योजना प्रभावीपणे राबविणे शक्य होणार आहे.

समित्यांची भूमिका आणि नियोजन जिल्हास्तरीय व विधानसभा क्षेत्रस्तरीय समित्यांमार्फत योजनेचा आढावा,निधी संकलन,अडचणींचे निराकरण आणि कामांच्या गुणवत्तेवर देखरेख करण्यात येणार आहे.दर तीन महिन्यांनी आढावा बैठक घेणे बंधनकारक आहे.

''मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना''ही केवळ पायाभूत सुविधा विकासाची योजना नसून ती शेतकऱ्यांच्या आर्थिक,सामाजिक आणि मानसिक सक्षमीकरणाचा पाया आहे.शेतापर्यंत पोहोचणारे दर्जेदार,अतिक्रमणमुक्त आणि बारमाही रस्ते उपलब्ध झाल्यास शेतीचा खर्च कमी होईल,उत्पादन वाढेल आणि शेतकऱ्यांचा बाजाराशी थेट संपर्क सुलभ होईल.ही योजना यशस्वीपणे राबविली गेल्यास ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा मिळेल आणि खऱ्या अर्थाने ''बळीराजा'' सशक्त होण्यास मदत होणार आहे.

**संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय**
**धाराशिव**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## आणि तहसीलदाराचा चपराशी झाला

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** तहसीलदाराच्या दोन बायकांची कथा सांगत काँग्रेस विधीमंडळ नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी भाजपचे माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार, माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर व आमदार किशोर जोरगेवार चंद्रपूर शहराला चपराशी केल्याशिवाय राहणार नाही असा किस्सा अतिशय विनोदी ढंगाने भाषणात सांगताच सर्वत्र हास्यकल्लोळ उठला. महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत सध्या आमदार विजय वडेट्टीवार यांच्या सभांना उमेदवारांकडून सर्वाधिक मागणी आणि गर्दी होत आहे. अतिशय विनोदी आणि ग्रामीण भाषेत वडेट्टीवार थेट लोकांपर्यंत मत पोहचवत असल्याने भाषणाला टाळ्या देखील मिळत आहे.

भानापेठ प्रभागात काँग्रेस उमेदवारांसाठी प्रचार सभा घेतांना वडेट्टीवार यांनी तहसीलदार झालेल्या एका ग्रामीण भागातील व्यक्तीची गोष्ट सांगितली.

साडी आणि लुगड नेसणाऱ्या दोन बायका या तहसीलदाराला होत्या. स्वातंत्र्य दिनी १५ ऑगस्टला तहसीलदाराला झेंडावंदन करायचे असल्याने नवीन ड्रेस शिवून आणला. घरी ड्रेस घालून बघितल्यावर चार बोट लंबा होता. त्यामुळे तहसीलदाराने लुगडेवाल्या बायकोला ड्रेस खालून चार बोटे कापण्यास सांगितला. तिने नकार दिला. त्यानंतर साडीवाली बायको हिलाही ड्रेस चार बोटे कमी करण्यास सांगितला. तिनेही मला पॅन्ट कापण्यासाठी आणले काय म्हणून नकार दिला. त्यामुळे नाराज होवून तहसीलदाराने पॅन्ट ठेवून दिला आणि झोपला. मात्र नवऱ्याला सकाळी झेंडा फडकवायचा असल्याने रात्री सर्व झोपले असल्याची खात्री करून नवरा झोपला आहे हे बघून पॅन्ट चार बोटे कापला आणि झोपून गेली. त्यानंतर साडीवाल्या बायकोने नवऱ्याला सकाळी झेंडावंदनाला जायचे असल्याने मध्यरात्री उठून पॅन्ट चार बोटे कापला आणि शिलाई मारून ठेवून दिला.

दरम्यान तहसीलदार सकाळी उठला, दोन्ही बायकांना सांगितल्यानंतरही त्यांनी पॅन्ट कापला नाही म्हणून तहसीलदाराने इतडे तिकडे पाहिले नाही आणि पॅन्ट चार बोटे कापला. त्यानंतर पॅन्ट घालून बघितला असता तहसीलदाराचा पॅन्ट चपराशाचा झाला होता. अशा पध्दतीने तहसीलदार चपराशी झाला ही गोष्ट अतिशय विनोदी ठंगाने सांगतांना टाळ्यांचा कडकडाट झाला. विशेष म्हणजे चंद्रपूर शहराचेही तहसीदाराचा चपराशी झाल्यासारखेच आहे. तिकडे माजी मंत्री आमदार सुधीर मुनंटीवार चंद्रपूर शहराला चार बोटे कापत आहे.

आमदार किशोर जोरगेवार यांनी देखील शहराला विकास कामात चार बोटे कापणे सुरू केले आहे तर माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर पून्हा शहराला चार बोट कापत आहे. अशा पदतीने चंद्रपूर शहराला चपराशी करण्याचे काम भाजपच्या या तिन्ही मंत्र्यांनी सुरू केले आहे. एकाच कामाच्या दोन पत्रिका, दोन उदघाटन, दोन बैठका असे सर्व प्रकार येथे सुरू आहे. विकास कामांचा निधी आला की टक्केवारी आणि महाकाली महोत्सवाच्या नावाने व्यापारी, कंत्राटदारांकडून खंडणी वसूली सुरू केली आहे. माता महाकाली यांना माफ करणार नाही, आशिर्वाद देणार नाही असेही वडेट्टीवार म्हणाले.

# कोल्हापूरच्या रणरागिणीचा अनोखा संकल्प; ३५०० पेक्षा जास्त किलोमीटरची युनेस्को किल्ले धाव मोहिम

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** आपल्या ऐतिहासिक गड किल्ल्यांना जागतिक दर्जा देऊन युनेस्कोनं १२ किल्ल्यांची जागतिक वारसाच्या यादीमध्ये नोंद केली आहे. याच युनिस्कोमध्ये नोंद झालेल्या किल्ल्यांच्या संदर्भात एक अनोखी मोहीम कोल्हापुरातील एका तरुणीनं आखली आहे. कोल्हापूरची प्रसिद्ध धावपटू आसमा कुरणे हिनं युनेस्कोच्या यादीतील सर्व १२ किल्ले जोडत एका अनोख्या धाव मोहिमेला सुरुवात केलीय. आजवर कोणीही न केलेली अशी ही धावमोहीम आहे. यामध्ये तब्बल ३५०० पेक्षा जास्त किलोमीटर सलग धावणार असल्याचंदेखील आसमा कुरणे हिनं सांगितलं आहे.

मोहिमेची वैशिष्ट्ये आणि महत्त्व- महाराष्ट्रातील शिवनेरी, लोहगड, रायगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, गिंगी, साळ्हेर, राजगड, खांडिरी आणि प्रतापगड यांचा युनेस्कोने जुलै २०२५ मध्ये जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्यताप्राप्त १२ गड-किल्ल्यांचा समावेश आहे. यापैकी आठ गड केंद्रीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडून (शिवनेरी, लोहगड, रायगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, गिंगी) आणि चार महाराष्ट्र पुरातत्त्व विभागाकडून (साळ्हेर, राजगड, खांडिरी, प्रतापगड) संरक्षित आहेत. प्रत्येक किल्ल्यावर आसमा इतिहास, संवर्धन आणि महिला शक्तीचा संदेश देणार आहे. सोशल मीडिया आणि प्रत्यक्ष सहभागातून जनजागृती करण्यात येणार आहे. कोल्हापुरात छत्रपती शिवाजी चौकात महाराजांना आणि राजमाता जिजाऊंना अभिवादन करून आसमानं या मोहिमेची सुरुवात केली आहे.

इतिहासाशी नाते जोडणारा संकल्प ''गड-किल्ले हे फक्त दगड नाहीत, ते महाराजांचे स्वप्न आहेत,'' अशी भावना आसमा कुरणे हिने मोहिमेच्या उद्देशाबाबत बोलताना व्यक्त केली. आजची तरुण पिढी इतिहासापासून दुरावत आहे. या गडकिल्ल्यांशी भावनिक नाते निर्माण होण्यासाठी, त्यांची जागतिक ओळख वाढवण्यासाठी आणि एका स्त्रीनं अशक्य वाटणारी गोष्ट साध्य करून सकारात्मक संदेश देण्यासाठी ही मोहिम हाती घेण्यात आल्याचं तिनं सांगितलं. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांना मानवंदना आणि राजमाता जिजाऊंच्या विचारांना कृतीत उतरवणारा हा एक प्रेरणादायी संकल्प आहे.





युनेस्को फोर्ट रन मोहिमेची ठळक वैशिष्ट्ये

युनेस्को यादीतील १२ गड-किल्ल्यांना जोडणारी पहिली धावमोहीम

३ हजार ते ३ हजार ५०० किलोमीटरहून अधिक सलग धावमोहीम

भारतातील पहिली महिला-आधारित युनेस्को फोर्ट रन

मोहिमेतून दिला जाणार इतिहास, संवर्धन आणि प्रेरणेचा संदेश

सोशल मीडियाचा जनजागृतीसाठी करणार वापर

मोहिम प्रेरणास्रोत ठरेल- महाराष्ट्राच्या महिला क्रीडा क्षेत्रात हे सुवर्णपान ठरणारी मोहिम केवळ वैयक्तिक नाही, तर महाराष्ट्राच्या वैभवशाली वारसा, इतिहास आणि मातृशक्तीचं प्रतीक ठरणार आहे. या मोहिमेमुळे गड-किल्ल्यांचे संवर्धन आणि पर्यटन वाढ होईल. त्याचबरोबर युवकांमध्ये स्वराज्यभावनादेखील नक्कीच जागृत होईल. महाराष्ट्राच्या इतिहासाला क्रीडा प्रकारातून पुन्हा एकदा जिवंत करण्याची मोहिम कौतुकास्पद असल्याची भावना इतिहासप्रेमी आणि क्रीडाप्रेमीमधून व्यक्त होत आहे.

आसमा कुरणे कोण आहे?- आसमा अजमल कुरणे ही कोल्हापूरची प्रसिद्ध धावपटू आहे. लोकशाही दौडसारख्या मोठ्या कार्यक्रमांमध्येही सहभागी होऊन तिनं योगदान दिलं आहे. २०१९ मध्ये महाराष्ट्र पोलिस इंटरनॅशनल मॅरेथॉनमध्ये ४२ किलोमीटरचे अंतर पार करत तिनं प्रथम क्रमांक पटकावला होता. २०२१ मध्ये प्रजासत्ताक दिनाच्या निमित्तानं तिने ताराराणी विद्यापीठापासून जयसिंगपूरपर्यंत ७२ किलोमीटर अंतर ९.३० तासांमध्ये सलग धावण्याचा विश्वविक्रम केला आहे. या विक्रमाची नोंद इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्डसमध्ये झाली आहे. तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त कोल्हापूर ते रायगड ३०० किलोमीटर धावण्याचा विक्रमही आसमानं केला आहे. धावण्याच्या तिच्या योगदानाबद्दल कोल्हापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून तिला युथ आयकॉन म्हणून पुरस्कारही प्रदान करण्यात आला आहे.

# श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांचे विचार विविध घटकांपर्यंत पोहोचवावे : निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी :** शीख धर्माचे ९ वे गुरु श्री गुरू तेग बहादूर साहिब जी यांनी १७ व्या शतकात तेव्हाच्या शासनकर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुद्ध आवाज उठवला.त्यांनी मानवी हक्कांसाठी बलिदान देऊन देशाच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक अस्मितेचे रक्षण केले. त्यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त त्यांचा गौरवशाली इतिहास माहीत व्हावा, त्यांनी केलेला प्रचार व दिलेले बलिदान याचे स्मरण होण्यासाठी त्यांचे विचार समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी जिल्ह्यात विविध कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात यावे. असे आवाहन जिल्हास्तरीय समितीचे नोडल अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी केले.




आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या कक्षात हिंद-दि- चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीद समागम शताब्दी वर्षानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत श्री कडवकर बोलत होते.या बैठकीला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहान,अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.तानाजी लाकाळ,जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी पुंडलिक गोडसे,जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे,जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) अनंत कुंभार,अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.व्ही.व्ही. कुलकर्णी,उपशिक्षणाधिकारी दत्तात्रय लांडगे,पोलीस निरीक्षक श्री. भुजबळ,मोटार वाहन निरीक्षक विकास डोंगरे व बहुजन कल्याण विभागाचे व्ही.एच.राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. श्री.कडवकर म्हणाले की.श्री गुरु तेग बहादूर साहीब जी यांच्या जीवन कार्यावर शाळा,विद्यालय आणि महाविद्यालयस्तरावर निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात.स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मुख्यमंत्री,पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.या आयोजनासाठी शिक्षण विभाग व विद्यापीठाच्या धाराशिव येथील उपकेंद्रने पुढाकार घेऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे तसेच श्री गुरु तेग बहादूर साहीब जी यांच्या जीवन कार्यावर चित्ररथाच्या माध्यमातून माहिती देण्यात येणार आहे.जिल्ह्यातील चित्रपटगृहातून गायक सरताज यांचे गीत दाखविण्यात येणार आहे. तसेच त्यांच्या जीवनावर आधारित माहितीपट दाखविण्यात येणार आहे असे श्री.कडवकर यांनी यावेळी सांगितले.

श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांचे इतर समाजाची असलेले जिव्हाळ्याचे संबंध या विषयावर पथनाट्यांचे शाळा व विद्यालयस्तरावर आयोजन करण्यात यावे असे सांगून श्री. कडवकर म्हणाले की,शाळास्तरावर प्रभात फेरी काढण्यात यावी. जिल्ह्यात असलेल्या शीख, सिकलीकर,बंजारा- लबाना, मोहियाल,सिंधी व इतर समाजापर्यंत हिंद दि चादर श्री गुरु तेग बहादुर साहीब जी यांचे विचार पोहोचविण्याचे काम विविध कार्यक्रमातून करण्यात यावे.नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमाला जाण्यासाठी इच्छुक असलेल्या जिल्ह्यातील समाज बांधवांसाठी आरटीओ विभागाने दानशूर व्यक्ती किंवा सीएसआरच्या माध्यमातून वाहनाची व्यवस्था तसेच लंगर,पाणी व्यवस्था करण्यात यावी. धाराशिव येथील आरोग्य विभागाने नांदेड येथे वैद्यकीय अधिकारी- कर्मचारी व रुग्णवाहिकेसह आपले पथक पाठवण्याची व्यवस्था करावी असे ते यावेळी म्हणाले.


## शब्दकोडे क्र. 62

आडवे शब्द

१. गडवा ३. दरवर्षीनुसार ७. ज्ञानेश्वरांची प्रार्थना १०. नाचक्की १२. पोपट १४. वर्तुळ १६. बट्टा, कलंक १७. कौशल्य १९. शोक २१. कडधान्याचा अंकुर २१अ. हिंदीत शब्द, भाषा २२. चुलती २३. रामाचा एक भाऊ २५. हत्ती २६. अचानक बाहेर पडणारा पाण्याचा प्रवाह, पाण्याचा उगम २७. जोराचा वारा २८. इतर २९. पिता ३१. कबूल ३३. मेंदू (हिंदी) ३४. गुंड ३५. अब्रू ३६. अनुमती ३८. पीकदाणी ४०. वितरण ४२. सूर्यापासून प्राप्त ४३. भस्म ४४. कफल्लक ४५. विष्णूचे एक नाव ४६. दासी ४७. लोकनाट्य ४९. प्रशंसा ५२. खोटारडा ५४. श्रीराम ५८. हिंदीत दोस्त ६०. शय्या ६१. शाबासकी, कौतुकाची – ६३. ओझे ६५. वालीचा मुलगा ६७. हे एक असेल तर दोन तलवारी कशा बसणार? ६८. दिवस वाईट आले की बुद्धीही फिरते याअर्थी म्हण- '----- विपरीत बुद्धी' ७१. ठिकाणा ७३. किनारा ७४. डौलदार ७७. भूमी ७९. न आवरता येणारा ८१. पक्ष्यांचा राजा ८२. उजळवर्णी ८३. आकाश ८५. यौवन ८६. क्रिडा ८८. समुद्र ८९. आश्चर्यचकित ९०. छंद ९१. अडचण

उभे शब्द

१. लाल २. पीडा ३. समाविष्ट, मिळालेला ४. शिल्लक ५. हिंदीत द्वारपाल, रखवालदार ६. कबूल ८. संचय ९. उदाहरण, दृष्टांत ११. अप्रीती १३. लहर, तरंग १५. पती, धनी १७. खिसेकापू १८. अधीन १९. संकट २०. पाऊस २१. '--जो, जो रे' २२अ. तुळशीचा रंग, गेरू २४. कमतरता २५. बोभाटा २७. अश्व २८. ज्याला कोणी शत्रू नाही असा ३०. अस्थिर ३१. रात्र ३२. पिता ३५. दुर्दशा, हेळसांड ३६. मृदंग ३७. परत परत ३९. च्या साठी ४१. स्नानाचे पाश्चात्त्य भांडे ४८. अजागळ ५०. दैवाने, नशिबाने प्राप्त ५१.'-- --' मोठेपण तया यातना कठीण' ५२. मनाई ५३. वडील ५५. घोट ५६. आवाज ५७. न बोलण्याचे व्रत ५९. जोर ६२. अकारण ६४. आई ६६. दहावी तिथी ६७. मांजराचा आवाज ६९. वर्ष, संवत्सर ७०. लहान मूल ७२. कापडी तंबू ७५. धावून येणाऱ्या सरीमुळे वाहून जाणारे मातींचे पात्र ७६. जसा ७७. किंचित ७८. गाव ८०. पावसाचा देव ८१. मोजदाद ८४. नाकातील खानदानी दागिना ८७. नम्र



### शब्दकोडे क्र. 61 चे उत्तर

आडवे उत्तर

१.रेडियो ४.बहादूर ७.मनाचे ेक ११.दर्यावर्दी १२.डूल १४.कथा १५.दीन १६.अस्पष्ट १७.खोटे १९.खोपा २२.तंटा २३.परावार २५.वडिलोपार्जित २६.दंग २७.सय २८.काली २९.गड ३०.विपरीत ३४.सावकार ३६.माळ ३७.बजरंगबली ३८.तरवार ४०.खर्डेघाशी ४२.वावडी ४३.कुळीथ ४५.मदत ४६.नाना ४७.सान ५०.तोटी ५१.वात ५३.सद ५४.रखरखीत ५५.कलम ५७.रस ५९.शिला ६१.रम ६२.नटसम्राट ६४.मनन ६६.श्री ६७.कामुक ७२.कचरा ७४.सत्यनारायण ७७.सावित्री ७९.दास्य ८०.हीन ८१.मवाळ

उभे उत्तर

१.रेती २.ओदन ३.अवनी ५.हास्यास्पद ६.रडू ८.नारी ९.ेक १०.कथाकार १२अ.लखोटा १५.दीपावली १८.नीरा २०.गलोल २१.अर्जित २२.तंग २३.पायरी २४.वारी २६.दंडकारण्य २७.सपक २८.कादंबरी २९.गवत ३१.आळशी ३२.करंगळी ३३.अंबर ३५.रवा ३६.माघार ३९.रवाना ४०.खडीसाखर ४१.दादला ४३.कुटील ४४.थवा ४६.नाद ४८.नरम ४९.पितर ५०.तोकडा ५२.तरस ५३.सलाम ५६.मनमुराद ५८.सम्राट ६०.छान ६३.टक ६५.नवरा ६७.काच ६८.प्रत्यही ६९.वणवा ७०.मासा ७१.कात्री ७२.कधी ७३.मैदा ७५.नान ७६.यम ७८.विडा

# जिजाऊंच्या मार्गदर्शनाने शिवबांनी स्वराज्य निर्माण केले : प्रकाश जाधव

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : शहाजीराजांच्या संकल्पनेतून जिजाऊंच्या मार्गदर्शनाने शिवबांनी स्वराज्य निर्माण केले. जिजाऊंच्या उपस्थितीत ६ जून १६७४ रोजी रायगडावर राज्याभिषेक झाला शिवराय छत्रपती झाले. असे प्रतिपादन मराठा सेवा संघाचे प्रकाश जाधव यांनी वाल्हेकरवाडी येथे जिजाऊ जयंती कार्यक्रमात केले. जिजाऊ जयंतीनिमित्त मराठा सेवा संघ,जिजाऊ ब्रिगेड,संभाजी ब्रिगेड व त्रिवेणी हॉस्पिटलच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रमुख मान्यवर महिलांनी जयंतीनिमित्ताने राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. रत्नप्रभा सातपुते यांनी जिजाऊ वंदना सादर केली. या कार्यक्रमास मराठा सेवा संघाचे प्रकाश जाधव,संपतराव जगताप,अनिल कारंजेकर,अशोक सातपुते मराठा सेवा संघाच्या आरोग्य कक्षाचे प्रमुख व त्रिवेणी हॉस्पिटलचे संचालक डॉ.मोहन पवार,बालरोगतज्ज्ञ डॉ.शैलेश मोरे,संभाजी ब्रिगेडचे प्रविण कदम,वैभव जाधव,राजेश सातपुते,किरण खोत जिजाऊ ब्रिगेडच्या सुलभा यादव,सुनिता शिंदे,माणिक शिंदे,अश्विनी पाटील,शालन घाटुळ,कौशल्या जाधव हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते. यावेळी छत्रपती शिवाजीमहाराज यांचे सेनानी झुंझारराव मरळ देशमुख यांचे वंशज निलेश मरळ देशमुख, डॉ.मोहन पवार,सुनिता शिंदे, प्रविण कदम यांनी जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विषयी मनोगते व्यक्त केली.आभार वैभव जाधव यांनी मानले. या आरोग्य शिबीराचा एकूण ७२ रुग्णांनी लाभ घेतला यासाठी त्रिवेणी हॉस्पिटलच्या तज्ञ डॉक्टरांसह सर्व स्टाफने सहकार्य केले.





## वृत्तविशेष...

### सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येतो. त्याअनुषंगाने जानेवारी महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, दि. १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. तरी पिडीत महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे.

महिला लोकशाही दिनात समस्याग्रस्त व पीडित महिलांनी उपजिल्हाधिकारी यांना उद्देशून विहित नमुन्यातील अर्ज द्विप्रतीत सादर करावेत. तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असणे आवश्यक आहे. लोकशाही दिनामध्ये महिलांनी स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. विहित नमुन्यात नसलेले अर्ज, न्यायप्रविष्ट, सेवा व आस्थापना विषयक प्रकरणे तसेच वैयक्तिक स्वरूपाचे नसलेले निवेदन स्वीकारले जाणार नाही. समस्याग्रस्त व पीडित महिलांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून, पीडित महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### जिद्दीनं निवडणूक जिंकली, पण नियतीनं घात केला, अजित पवार गटाच्या नगरसेविकाचा करुण अंत

दैनिक आपला विदर्भ

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर जिल्ह्यातील अहमदपूर शहरातून मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत मोठ्या फरकाने विजयी झालेल्या आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनिर्वाचित नगरसेविका शाहूताई कांबळे यांचा मृत्यू झाला आहे. पहाटे अचानक त्यांना छातीत त्रास जाणवू लागला. पण वेळेवर उपचार न मिळाल्याने त्यांची प्राणज्योत मालवली.

मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटे शाहूताई कांबळे यांना अचानक छातीत तीव्र वेदना होऊ लागल्या. त्यांच्या नातेवाईकांनी विलंब न करता त्यांना अहमदपूर शहरातील खाजगी रुग्णालयांत धाव घेतली. मात्र, पहाटेची वेळ असल्याने शहरातील अनेक खाजगी रुग्णालये बंद होती, तर काही ठिकाणी डॉक्टर उपलब्ध नव्हते. तब्बल एक तास उपचारासाठी वणवण फिरल्यानंतर अखेर त्यांना शासकीय ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले.

दुर्दैवाने, शासकीय रुग्णालयात पोहोचण्यास खूप उशीर झाला होता. डॉक्टरांनी उपचार सुरू करण्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. १५ ते २० मिनिटं आधी उपचार मिळाले असते, तर कदाचित शाहूताई आज आपल्यात असत्या, अशी भावना त्यांच्या नातेवाईकांनी व्यक्त केली आहे.

शाहूताई कांबळे या राष्ट्रवादी काँग्रेसच्या अत्यंत निष्ठावान कार्यकर्त्या होत्या. २०१७ च्या निवडणुकीत त्यांचा अवघ्या १२ मतांनी पराभव झाला होता, मात्र त्यांनी जनसंपर्क सोडला नाही. यंदा सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी त्यांच्यावर विश्वास टाकला आणि त्यांच्या विजयासाठी स्वत: मैदानात उतरले होते.

### नालासोपाऱ्यात मध्यरात्री थरार! नागरिकांनी पाठलाग करुन दुचाकी अडवली अनब पिशवी उघडताच पोलिसांचेही डोळे विस्फारले!

**नालासोपारा /प्रतिनिधी :** एका दुचाकीस्वाराचा संशय आल्याने काहीजणांनी त्यांचा पाठलाग केला. कोणीतरी पाठलाग करतोय हे पाहून त्यांनीदेखील आपल्या दुचाकीचा वेग वाढवला. मात्र, दुचाकीस्वाराला अडवून त्याची तपासणी केल्यानंतर एकच खळबळ उडाली. विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नालासोपाऱ्यात मोठी खळबळ उडाली. पेल्हार फाटा परिसरात तब्बल दहा लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. ही रोकड भाजपाची असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून मतदारांना वाटप करण्यासाठी ती नेली जात होती का, याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री सुमारे दोनच्या सुमारास पेल्हार फाटा येथे एका संशयित इसमाच्या हालचाली नागरिकांच्या लक्षात आल्या. संशय बळावल्याने काही स्थानिक नागरिकांनी त्याच्या वाहनाचा पाठलाग करून गाडी अडवली. त्यानंतर घटनेची माहिती तात्काळ पेल्हार पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत संशयिताच्या वाहनाची झडती घेतली असता, वाहनामध्ये भाजपाचा लोगो असलेली पिशवी आढळून आली. या पिशवीमध्ये आणखी एक प्लास्टिकची पिशवी ठेवण्यात आली होती. तपासणीदरम्यान या पिशवीतून रोख दहा लाख रुपये सापडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. ही रक्कम कोणत्या उद्देशाने नेली जात होती, याबाबत समाधानकारक माहिती संशयिताकडून मिळू शकलेली नाही. त्यामुळे ही रोकड निवडणूक काळात मतदारांना वाटण्यासाठीच नेली जात असल्याचा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. व्हिडीओनुसार, एका बंद पाकिटात ही रक्कम ठेवण्यात आली होती. अशी अनेक बंद पाकीटे जप्त करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी संबंधित संशयिताला ताब्यात घेतले असून त्याच्याविरुद्ध पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अमृत दिनदर्शिकेला बुलढाण्यात उत्स्फूर्त प्रतिसाद; योजनांची माहिती थेट नागरिकांपर्यंत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : अमृत ही राज्य शासनाची स्वायत्त संस्था खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी कार्यरत असून, संस्थेच्या विविध योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अमृततर्फे विशेष दिनदर्शिका तयार करण्यात आली आहे. या अमृत दिनदर्शिकेला बुलढाणा जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, शासनाच्या योजनांची माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचत आहे.

अमृत संस्थेच्या योजनांची सविस्तर माहिती देणारी ही दिनदर्शिका जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून सर्व स्तरांवर वितरित करण्यात येत आहे. या दिनदर्शिकेमध्ये अमृत संस्थेच्या विविध योजनांची माहिती, पात्रतेच्या अटी, लाभ तसेच अर्ज प्रक्रियेविषयीचे स्पष्ट मार्गदर्शन देण्यात आले असून, ती सर्वसामान्य नागरिकांसाठी उपयुक्त मार्गदर्शक ठरत आहे. अमृत दिनदर्शिकेच्या माध्यमातून शासनाच्या योजना घरोघरी पोहोचून त्यांचा लाभ गरजू घटकांना होत आहे.

अमृत संस्थेविषयी : महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत ही राज्य शासनाची स्वायत्त संस्था असून, खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना आजवर कोणत्याही शासकीय संस्था किंवा महामंडळांचा लाभ मिळालेला नाही, अशा जातींमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक हा अमृत संस्थेचा लक्षित गट आहे. यामध्ये ब्राह्मण, कोमटी, मारवाडी, ठाकूर, गुजराती, सिंधी, कायस्थ, जाट, बणिया, बंत्स, नायर, अय्यंगार, पाटीदार, बंगाली, पटेल, येलमार, त्यागी, सेनगुनथर, राजपुरोहित, नायडू, एलमार आदी जातींचा समावेश आहे. वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या व्यक्ती अमृत संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घेऊ शकतात.

अधिक माहितीसाठी जिल्हा व्यवस्थापक श्री. जिग्नेश कमाणी (मो. ८३०८९९८९२२) यांच्याशी संपर्क साधावा. तसेच अमृत जिल्हा कार्यालय, फ्लॅट नं. ३०५, तिसरा मजला, बुलढाणा प्राइड बिल्डिंग, तहसील कार्यालयासमोर, बुलढाणा येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## 'द राजा साब' चित्रपटाच्या कमाईमध्ये झाली घट, जाणून घ्या बॉक्स ऑफिस कलेक्शन...

**मुंबई/प्रतिनिधी** : साऊथ अभिनेता प्रभास स्टारर 'द राजा साब'नं बॉक्स ऑफिसवर शानदार ओपनिंग केली. मात्र हा चित्रपट आता रुपेरी पडद्यावर थोडा मंद गतीनं कमाई करत आहे. या चित्रपटानं आता रुपेरी पडद्यावर वीकेंड पूर्ण केला आहे. पहिल्याच आठवड्यात या चित्रपटानं देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर १०० कोटींचा टप्पा ओलांडला, मात्र आता हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर कमाईबाबात संघर्ष करत आहे. 'द राजा साब' हा चित्रपट आता प्रेक्षकांना निराश करत आहे. प्रभासच्या हॉरर कॉमेडी ड्रामाची क्रेझ आता कमी होत आहे.

'द राजा साब' या चित्रपटाद्वारे प्रभासनं पहिल्यांदाच विनोदी शैली दाखवली, जी कोणाला आकर्षत करू शकली नाही. सॅकनिल्कच्या मते पहिल्या शुक्रवारी 'द राजा साब'नं भारतात ५३.७५ कोटी कमाई केली. याआधी, चित्रपटानं पेड प्रिव्ह्यूमध्ये तेलुगूमध्ये ९.१५ कोटी कमाई केली होती. दुसऱ्या दिवशी, शनिवारी, चित्रपटानं २६ कोटी आणि रविवारी १९.१ कोटी कमाई केली होती. यासह, चित्रपटानं त्याच्या पहिल्या आठवड्याच्या शेवटी १०० कोटींचा टप्पा ओलांडला, १०८.७ कोटी कमई केली. यापैकी ९१ कोटी तेलुगूमधून आणि १५.७५ कोटी हिंदीमधून. चित्रपटाचा चौथ्या दिवसाचं कलेक्शन ६.६ कोटी आहे, ज्यामुळं त्याचे एकूण देशांतर्गत कलेक्शन ११४.६ कोटी झाले आहे. 'द राजा साब'ची जगभरात १०० कोटींपेक्षा जास्त कमाई झाली आहे. चित्रपट दुसऱ्या आठवड्याच्या शेवटी किती कमाई करेल हे काही दिवसात समजेल, रिलीजच्या चौथ्या दिवशी ६.६ कोटी कमाई केल्यानंतर हा चित्रपट कमाई करण्यात बॉक्स ऑफिसवर संघर्ष करेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मकर संक्रांती सणाच्या आठवड्यात बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करेल अशी अपेक्षा आता प्रभासचे चाहते करत आहे. मारुती दिग्दर्शित,'द राजा साब'मध्ये प्रभास, संजय दत्त, मालविका मोहनन, निधी अग्रवाल, रिद्धी कुमार, बोमन इराणी आणि जरीना वहाब हे कलाकार आहेत.

## मुख्यमंत्री फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवारांचा समाचार घेणार का?

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे गेल्या दोन आठवड्यांपासून पुण्यात तळ ठोकून असून, सातत्याने भाजपला लक्ष्य करत आहेत. मात्र, अजित पवार यांचा झंझावती प्रचार रोखणे भाजपच्या स्थानिक शिलेदारांना अशक्य झाल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच शेवटच्या क्षणी मैदानात उतरावे लागले आहे. मुख्यमंत्री फडणवीस हे आज पुण्यात प्रचाराची सांगता सभा घेऊन अजित पवार यांचा समाचार घेणार का? याबाबत भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी निश्चित करण्यापासून पुण्यामध्ये आहेत. प्रचारामध्ये त्यांनी सातत्याने भाजपला लक्ष्य केले आहे. भाजपने उमेदवारी नाकारलेल्या माजी नगरसेवकांना उमेदवारी देऊन अजित पवार यांनी भाजपला आव्हान दिले आहे.

# किनगाव जट्टू येथे राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेबांना अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**किनगाव जट्टू/प्रतिनिधी** : येथील फुले, शाहू, आंबेडकर विचार मंच यांच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब यांना अभिवादन करण्यासाठी सोमवार, १२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता विठ्ठल-रुक्मिणी मंदिर सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन गावच्या सरपंच शारदा ताई महाजन व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शारदा ताई महाजन या होत्या. यावेळी लहान विद्यार्थिनी जानवी दीपक सानप, लक्ष्मी जाधव, तसेच राजेश नागरे आणि फुले, शाहू, आंबेडकर विचार मंचाचे अध्यक्ष अमोल पालकर यांनी राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब यांच्या जीवनकार्यावर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमानंतर उपस्थित मुली व मुलांना शालेय साहित्य (पेन, वही) तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सदस्य मथुराबाई जाधव, राजेश नागरे, विनोद सातपुते, ग्रामविकास अधिकारी तसेच अमोल पालकर, राजू जाधव, संजय राठोड, संजय जाधव यांच्यासह गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी फुले, शाहू, आंबेडकर विचार मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## अमृतच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण योजना

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिकांसाठी महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था अमृतच्या माध्यमातून मोफत स्वयंरोजगार व कौशल्य विकास प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत लाभार्थ्यांना वैयक्तीक व्याज परतावा, रोजगारक्षम व स्वयंरोजगारासाठी आधुनिक प्रशिक्षण मोफत उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

प्रशिक्षणांचा मुख्य उद्देश लाभार्थ्यांना स्वावलंबी बनवून त्यांचे सामाजिक व आर्थिक स्थान उंचावणे आहे. ज्यांना आजवर कोणत्याही शासकीय अनुदान, महामंडळ किंवा शासकीय योजनांचा लाभ मिळालेला नाही, अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना अमृतच्या माध्यमातून लाभ दिल्या जाणार आहे.

योजनेंतर्गत प्रशिक्षणे : ॲडव्हान्स ब्युटी पार्लर व फॅशन डिझायनिंग, अमृत सूर्य मित्र, आयात-निर्यात, बेकरी, अन्न व फळ प्रक्रिया, गृह उद्योग, इव्हेंट व्यवस्थापन, मसाले उत्पादन, फोटोशॉप व ग्राफिक डिझायनिंग, मोबाइल रिपेअरिंग, दुग्धजन्य उत्पादने उत्पादन प्रशिक्षण, असे विविध रोजगाराभिमुख प्रशिक्षणे दिली जाणार आहेत. ही योजना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असून राजपूत, ठाकूर, ब्राह्मण, मारवाडी, गुजराती, कोमटी, सिंधी, कायस्थ, जाट, बनिया, बंत्स, कम्मा, नायर, नायडू, एय्यंगार, पाटीदार, बंगाली पटेल, येलमार, त्यागी, राजपुरोहित, सेनगुंनथर इत्यादी समाजातील पात्र नागरिकांचा समावेश आहे. तरी जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा व स्वतःचा रोजगार उभारून स्वयंपूर्ण व्हावे, असे आवाहन अमृत संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी जिल्हा व्यवस्थापक जिग्नेश कमाणी (८३०८९९८९२२) अमृत जिल्हा कार्यालय, फ्लॅट नं. ३०५, तिसरा मजला, बुलढाणा प्राइड बिल्डिंग, तहसील कार्यालय समोर, बुलढाणा येथे संपर्क साधावा.

# जिल्हास्तरीय सूर्यनमस्कार प्रशिक्षण व योगसाधना शिबीर उत्साहात संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा तसेच आहिल्या योग केंद्र व निसर्ग उपचार केंद्र, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आज सकाळी भारत विद्यालय, बुलढाणा येथे जिल्हास्तरीय सूर्यनमस्कार प्रशिक्षण-स्पर्धा व योगसाधना शिबीर उत्साहात पार पडले.

छत्रपती योग व क्रीडा प्रशिक्षण केंद्र, ता. अंबड, जिल्हा जालना येथे झालेल्या राज्यस्तरीय सूर्यनमस्कार शिक्षक प्रशिक्षण (टी.ओ.टी.) स्पर्धा व दोन दिवसीय योगसाधना शिबिरातून प्रशिक्षित झालेले मास्टर ट्रेनर्स यांच्या तांत्रिक सहकार्याने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत सूर्यनमस्काराची शास्त्रशुद्ध पद्धत, योगसाधनेचे महत्त्व व नियमित सरावाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षणाचा लाभ भारत विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकवृंद यांनी घेतला. शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होऊन योगसाधनेकडे सकारात्मक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमास भारत विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रल्हाद गायकवाड, क्रीडा अधिकारी एस. एस. केळे यांच्यासह तारामती बद्रीनाथ जायभाये, उज्वला विजय शिंदे, सरला देशमुख, कालींदा नागरे (मास्टर ट्रेनर), स्वाती देगुलकर (मास्टर ट्रेनर), नंदा शेजोळ चाटे (मास्टर ट्रेनर), अर्चना फासे (जुमडे), जयश्री देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

